# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक २५.०९.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २४.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये २४ केसेसमध्ये ३१ ईसमावर कारवाई करून एकुण १०,३२,४६१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये ०९ इसमांवर कारवाई करून एकुण ४०,९७३/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, दिनांक २४.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २५.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये **कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ५८ इसमांवर** कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ४३ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १६७ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २२८ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ५३ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ११९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १३ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ७७ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०९ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ३९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये २७ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,४४३ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे २९ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ३३ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,४३५ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १०,५६,९००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २४.०९.२०२६ चे २०.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यानी खात्रीशीर माहीती मिळाली की, संघर्ष नगर, प्रधानमंत्री आवास योजना येथे एका काळ्या रंगाचे स्कॉर्पीयो कारमध्ये बसलेला ईसम एम.डी पावडर विक्री करीता आलेला आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून, घटनास्थळी गेले व स्कॉर्पीयो कार ला घेराव टाकुन, चालकास खाली उतरविले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव ईजाजउद्दीन सिद्दीकी वल्द रियाजउद्दीन सिद्दीकी, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. १४७, हमीद नगर, कब्रस्तान जवळ, यशोधरानगर,

नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे जिन्स पॅन्टचे उजव्या खिशात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण ५८ ग्राम ६०० मि.ग्राम एम.डी. पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन व स्कॉर्पीयो कार क्र. एम.एच. ३५ पि. ६४६५ असा एकुण १०,०६,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद एम.डी पावडर ही त्याचे साथीदार पाहीजे आरोपी नामे १) अमीर मुकीम मलीक व त्याचा भाऊ २) करीम मुकीम मलीक, दोन्ही रा. प्लॉट नं. २५८, हमीद नगर, नागपुर यांची असल्याचे सांगुन, तो तसेच, त्याचे साथीदार पाहीजे आरोपी क्र. ३) शिबु मलीक, ४) कैफ मलीक, दोन्ही रा. टेका, पाचपावली, नागपुर ५) सागर मोहम्मद लतीफ अन्सारी, रा. एकता कॉलोनी, यशोधरानगर, नागपुर ६) ओसामा, रा. गरीब नवाज नगर, नागपुर असे सर्वजण मुकीम व करीम यांचेकरीता एम.डी. पावडर विक्री करीत असल्याचे सांगुन, ईतर पाहीजे आरोपी क्र. ३ ते ६ यांना एम.डी पावडर देण्याकरीता घटनास्थळी थांबला असल्याचे सांगीतले.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोहवा. शेख इम्रान, विवेक अढाऊ, ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड व राहुल पाटील यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. २ पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २४.०९.२०२६ चे ०२.१० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत सुभाष नगर मेट्रो स्टेशन ते हिंगणा टि—पॉईन्ट कडे जाणाऱ्या रोडवर एका ॲक्टीवारील दोन मुले संशयीतरित्या फिरतांना दिसल्याने त्यांनी त्यांना थांबवुन, त्यांना त्यांची नांव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नाव अक्षय चंद्रशेखर यावलकर, वय २९ वर्षे, रा. न्यु निलडोह, सोनाली पॉवर कंपनी, क्वॉर्टर नं. एस/५४, एमआयडीसी, नागपूर व दुसरा विधीसंघर्षग्रस्त बालक

असल्याचे समजले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्याची अंगझडती घेतली असता, आरोपीचे ताब्यात पॅन्टचे खिशात एक झिपलॉक पन्नीमध्ये अंमली पदार्थ एम.डी पावडर वजनी ११ ग्राम मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२ मोबाईल फोन व ॲक्टीवा गाडी क्र. एम.एच ३१ जि.सी. ५८३० असा एकुण १,२५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकास अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहीजे आरोपी नामे फारूख शेख, वय २० वर्षे, रा. महाजनवाडी, नागपूर याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव राणाप्रतापनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे व विधीसंघर्षग्रस्त बालकास त्याचे पालकांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, सपोनि. चेतन बोरखेडे, पोउपनि. मनोज राऊत, पोहवा. महेंद्र सडमाके, पोअं. आशिष धंदरे, संदीप पांडे व कमलेश गहलोद यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे जरीपटका :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २४.०९.२०२६ चे २१.३५ चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, जरीपटका चौक, जिंजर मॉल जवळ फिर्यादीचा मुलगा नामे आबिद उर्फ आबु रज्जाक शेख, वय १४ वर्षे, रा. गौतम नगर, सुधीर किराणा जवळ, जरीपटका, नागपूर हा त्याचा मित्र नामे अंतराल सिंह, रा. लुंबीनी नगर, ह.मु.— दत्तवाडी, नागपुर तसेच, अमानत ईकबाल शेख व त्यांचे ईतर मित्र उभे होते. फिर्यादीचा मुलगा आबु याचे दोन—तिन महीन्यांपुर्वी पाचपावली येथे राहणाऱ्या सोहेल खान नावाचे मुलासोबत झालेल्या भांडणाचे कारणावरून, सोहेल व त्याचे ईतर १०—१२ साथीदारांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन, घटनास्थळी येवुन फिर्यादीचे मुलास व त्याचे मित्रांना शिवीगाळी करून त्यांचेवर दगड विटां फेकुन मारल्या तसेच फिर्यादीचे मुलास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने शस्त्राने वार करून, त्याला गंभीर जखमी केले. तसेच त्याचा मित्र नामे अंतराल सिंह याचेवर वार करून जखमी केले. जखमींना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास तपासुन मृत घोषित केले. अंतराल सिंह याचेवर उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती तबस्सुम रज्जाक शेख, वय ३४ वर्षे, रा. गौतम नगर, सुधीर किराणा जवळ, जरीपटका, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे मपोउपनि. कौशल्या बाबर यांनी

आरोपीविरुध्द कलम १०३(१), १०९(१), ३५१(२), ३५२, १८९(२), १८९(४), १९०, १९१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २४.०९.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा पुतण्या नामे काशीफ जावेद सिद्दीकी, वय १३ वर्षे, रा. प्लॉट नं. १०, पंचवटी आश्रम जवळ, आदर्श नगर, उमरेड रोड, नागपुर हा त्याचे सायकलने पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग, एसबिआय बॅक दिघोरी ते भांडेप्लॉट कडे जाणाऱ्या उड्डाणपुलावरून जात असता, रॉयल इन्फील्ड हंटर बुलेट गाडी क्र. एम.एच ४९ सि.एन ५३३६ चा चालक आरोपी नामे विजय तिडके याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे पुतण्याचे सायकलला धडक देवुन त्यास गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यास उपचाराकरीता यश हॉस्पीटल व तेथुन मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी नामे आफताब अहमद सिद्दीकी, वय ४७ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. कुणाल दिघावकर ८००७८५९५२६ यांनी बुलेट दुचाकी चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ११, नागपुर. | ४३७०/२००७ | कलम ३५४ भा.दं.वि. | फिरोज खान अताउल्लाह खान, रा. सर्वश्री नगर, चामट चक्की जवळ, ताजबाग, अफजल मियॉ चे घरी किरायाने, सक्करदरा, नागपुर. | ३०.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**